# अर्श कार्यक्रम

## (Arsh- Adolecent Reproductive Sexual Health)

## किशोरवयीन प्रजनन व लैगिंक आरोग्य

प्रस्तावना :

राज्यात किशोरवयीन मुलामुलींची संख्या(वय वर्ष १० ते १९) एकुण लोकसंख्येच्या २३ टक्के आहे. किशोरवयामध्ये शारीरिक वाढीचे वेळी भावनीक,मानसिक,लैगिक बदल होत असतात.याबाबत समाजामध्य,कुटूंबामध्ये,शाळा कॉलेजमधून योग्य माहीती मिळणे दुरापास्त असते चुकीच्या माहीती मुळे मुलामुलींमध्ये गैरसमज निर्माण होतात.त्या करिता अर्श कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली.

कार्यक्रमाचे उद्देश :-

१) रोजच्या आयुष्यात येणा-या परिस्थितीशी यशस्वी व परिणामकारक रित्या लढा देण्याची क्षमता वाढविणे
२) त्यांना आरोग्यदायी सवयी व वागणुकीची माहीती देणे
३) लैगिक पुनरुत्पादन संबधी ज्ञान,दृष्टीकोन व वर्तन सुधारणा करणे
४) मादक पदार्थाच्या अनिष्ट परिणामाबाबत जागरुकता किशोरवयात वाढविणे.
५) किशोरवयातील गर्भधारणा कमी करणे
६) पौगंडावस्थेतील मुला मुलीमधील कुपोषणाचे प्रमाण कमी करणे
७) लोहाचे प्रमाण कमी झाल्यामुळे होणा-या रक्तक्षयाचे प्रमाण कमी करणे.
८) माता मृत्यु दर,अर्भक मृत्यु,बाल मृत्यु दर,कमी करणे
९) कमी वजनाच्या बालकाचे प्रमाण कमी करणे
१०) निरोगी/किशोरवयीनांचे रुपांतर प्रौढात होते त्यामुळे त्यांच्या मध्ये शारीरिक,मानसिक व भावनिक सामर्थ्य वाढविणे
११) मानसिक ताण रक्तदाब,मधुमेह,यासारखे आजार टाळण्यासाठी पौगडावस्थेतील बदला बद्दल प्रोत्साहन देणे.

# अर्श कार्यक्रमा अंतर्गत राबविण्यात येणारे कार्यक्रम (लाभार्थी १०-१९ वयोगट)

- मैत्रि क्लिनीक
- विकली आर्यन फॉलीक ॲसिड सप्लीमेंन्टेशन योजना (WIFS)

१) मैत्रि क्लीनिक असणारे ठिकाण :-

| अ.क्र | रुग्णालयाचे नाव | मौत्रि क्लिनीक योचे दिवस |
|---|---|---|
| १ | वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय-यवतमाळ | सोमवार ते शुक्रवार |
| २ | उपजिल्हा रुग्णालय- दारव्हा | दर मंगळवारी |
| ३ | ग्रामिण रुग्णालय - दिग्रस | दर मंगळवारी |
| ४ | ग्रामिण रुग्णालय - मारेगाव | दर मंगळवारी |
| ५ | ग्रामिण रुग्णालय - वणी | दर मंगळवारी |

मैत्रि क्लिनिक मध्ये दिल्याजाणा-या सेवा :

मैत्री क्लिनीक मध्ये १० ते १९ वयोगटातील किशोरवयीन विवाहीत,अविवाहीत मुला मुलीना प्रजनन आरोग्य,लैगिक आरोग्य इ. तसेच त्यांना इतर असणा-या अडचणी बाबत समुपदेशन केले जाते तसेच आरोग्या बाबत किंवा वैयक्तीक समस्या बाबत मार्गदर्शन केले जाते सर्व समस्या बाबत गोपनीयतेची हमी दिली जाते.व गोपनीयता पाळली जाते तसेच आजारावर उपचार केले जातात व तज्ञ डॉक्टरांन कडे संदर्भित केले जाते

बाहयसंपर्क कार्यक्रम :- शाळा कॉलेज तसेच बचतगटातील महीलांन करिता प्रजनन व लैगिक आरोग्य मार्गदर्शना करिता कार्यशाळा आयोजीत केल्या जातात.

विकली आर्यन फॉलीक ॲसिड सप्लीमेंन्टेशन योजना (WIFS) लोह व फॉलीक ॲसिडच्या कमतरतेमुळे होणारा रक्तक्षय ही प्रमुख आरोग्य समस्या आहे.पौगंडावस्थेत रक्तक्षय असलयास किशोरवयीन मुला व मुलींची शारीरिक वाढ खुंटते व मानसिक विकास चांगल्या पध्दतीने होत नाही तसेच भविष्यात विविध आरोग्य विषयक समस्यांना तोंड द्यावे लागते म्हणुन विकली आर्यन फॉलीक ॲसिड सप्लीमेंन्टेशन योजना (WIFS) राबविण्यात येत आहे.

अपेक्षित लाभार्थी :- १) इयत्ता ६ वी १२ वी पर्यत शाळेत जाणा-या सर्व मुले व मुली

२) शाळेत न जाणा-या १० ते १९ वर्ष वयोगटातील सर्व मुली

ग्रामिण भागातिल शाळेत ६ वी ते १२ वी वर्गातील मुला ुमुलींना दर सोमवारी एक लोहयुक्त गोळी याप्रमाणे सलग ५२ आठवडे देण्यात येतात.तसेच १० ते १९ वयोगटातील ज्या मुली शाळेत जात नाही अशा शाळा बाहय मुली व १० ते १९ वयोगटातील विवाहीत पण गरोदर नसलेलया सर्व मुलींना अंगनवाडी मधुन दर सोमवारी एक लोहयुक्त गोळी याप्रमाणे सलग ५२ आठवडे देण्यात येतात.

तसेच या सर्व मुला मुलीनां वर्षातुन दोन वेळा ऑगस्ट व फरवरी महिण्यात एक जंतनाशक गोळी दिली जाते.

आजचे किशोर हे भावी पिढी आहे.त्यामुळे भावी पिढी सशक्त सुदृढ व निरोगी बनावी या करिता सर्व पालकांनी तसेच किशोरयीन मुला मुलींनी या कार्यक्रमाची फायदा घ्यावा व आपले आयुष्य आरोग्यदायी व आनंदी बनवावे.

## साप्ताहिक लोह व फॉलिक ॲसिड गोळया पुरवणी योजना अंतर्गत मार्गदर्शक सूचना

१) लोहाची एक गोळी दर आठवड्यात प्रत्येक सोमवारी इयत्ता ६ वी ते १२ वी मधील सर्व मुले व मुली यांना देणे.
२) जंतनाशक गोळी माहे ऑगस्ट व फेब्रुवारी महिन्यात देण्यात यावी.
३) जेवणानंतर अर्ध्या तासानंतर या गोळ्या वर्गातच शिक्षकांच्या समोर देण्यात याव्यात.
४) सोमवारी विद्यार्थी/विद्यार्थीनी गैरहजर असेल तर तो/ती हजर झालेल्या दिवशी गोळी देण्यात यावी आणि पुढील आठवड्याची गोळी ठरलेल्या दिवशीच म्हणजेच सोमवारी देण्यात यावी.
५) गोळी सेवनानंतर शौचास काळी झाल्यास घाबरू नये आणि गोळी सेवन करण्यास टाळू नये किंवा थांबवू नये.

## गोळ्यांच्या नियमित सेवनानंतर खालील फायदे होतील.

१) विद्यार्थ्यांत एकाग्रता वाढून त्यांची शालेय प्रगती होण्यास मदत होते.
२) थकवा कमी होऊन ताजे-तवाने वाटते आणि मुले/मुली यांच्या शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक क्षमतेत वाढ होते.
३) भूक वाढून शारीरिक वाढ चांगली होते.
४) किशोरवयीन मुली व मुले यांचे आरोग्य सुधारल्यामुळे देशाची भावी पिढी सशक्त होईल.
५) किशोरवयीन मुलींचे आरोग्य सुधारल्यामुळे देशाचा माता मृत्यू दर आणि अर्भक मृत्यू दर कमी होईल तसेच कमी वजनाच्या बालकाचे प्रमाण कमी होईल.

NATIONAL HEALTH MISSION
राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

## सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन

राष्ट्रीय आरोग्य अभियान

सत्यमेव जयते

## साप्ताहिक लोहयुक्त गोळ्या पुरवणी योजना, वैयक्तिक पाठपुरावा कार्ड

किशोरवयीन मुलांच्या व मुलींच्या रक्तातील लोह पातळी वाढावी यासाठी भारत सरकारचे एक महत्त्वपूर्ण पाऊल

नाव : ______________________________

मुलगा ☐ मुलगी ☐ वय ☐

शाळेचे नाव व पत्ता : ______________________________

विद्यार्थी राहणाऱ्या गावाचे नाव : __________ तालुका : __________ जिल्हा : __________

आयर्न फॉलिक ॲसिड गोळी (IFA) सुरु केल्याचा दिनांक : / /२०



# किशोरवयीन मुला-मुलींसाठी निळ्या गोळीचे जणू वरदान
# करी देशाची भावी पिढी बलवान

सॉलिड हो इंडिया

किशोरवयीन मुलांच्या व मुलींच्या रक्तातील लोह पातळी वाढावी यासाठी
भारत सरकारचे एक महत्वपूर्ण पाऊल

सत्यमेव जयते

## वैयक्तिक पाठपुरावा कार्ड

प्रपत्र - १

| | जंतनाशक गोळी | | साप्ताहिक आयर्न फोलिक ॲसिड गोळ्या तपशील | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इयत्ता/ वय वर्ष | पहिला डोस दिनांक | दुसरा डोस दिनांक | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टोबर | नोव्हेंबर | डिसेंबर |
| | | | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) |
| | | | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) |
| | | | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) |
| | | | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) |
| | | | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) |
| | | | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) |
| | | | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) |
| | | | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) |
| | | | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) |
| | | | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) | (1) (2) (5) (4) (3) |





टिप : १) चौकोनात प्रत्येक गोल आठवडयाला दिलेल्या गोळीची नोंद करण्याकरिता आहे.

२) चौकोनात ५ गोल आठवडेदर्शक दिले आहेत. ज्या महिन्यात ५ आठवडे असतील त्यासाठी ५ व्या गोलामध्ये गोळी दिल्याची नोंद करावी.

# धर्मदाय रुग्णालय

प्रस्तावणाः-

निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना मोफत व सवलतीच्या दराणे वैद्यकीय उपचार उपलब्ध व्हावेत याकरिता सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था संचालीत धर्मदाय रुग्णालये सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमाचे कलम ४१ क क हे दिनांक १ ऑगस्ट १९८६ पासुन अमलात आलेले आहे.मा उच्च न्यायालय मुंबई यांचे समोरील सदर रिट याचिका (पीआयएल)क्रमांक ३१३२/२००४ वर दिनांक १५ एप्रिल २००९ रोजी अंतिम निर्णय झालेला आहे.सदर योजना ही दिनांक १ सप्टेंबर २००६ पासुन अमलात आलेली आहे.

**धर्मदाय रुग्णालय खालील प्रमाणे :-**

१) आयुर्वेद रुग्णालय,यवतमाळ

२) कमला आरोग्य मंदीर,यवतमाळ

३) आयुर्वेद रुग्णालय,पुसद

४) उमरी ख्रिश्चन हॉस्पीटल,उमरी

निर्धण व्यक्ती म्हणजे ( बीपीएल)जिचे एकुण वार्षिक उत्पन्न पन्नास हजार रुपयाहुन कमी किंवा राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेव्दारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा अन्य मर्यादाहुन अधिक नसेल अशी व्यक्ती.

समाजातील दुर्बल घटकातील व्यक्ती,म्हणजे जी निर्धन नाही,परंतु,जिचे उत्पन्न दरसाल एक लाखाहुन जास्त नसेल किंवा राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेव्दारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा अन्य मर्यादाहुन अधिक नसेल अशी व्यक्ती.

निर्धण व्यक्ती व दुर्बल घटकातील व्यक्ती साठी मोफत उपचारा करिता १० टक्के खाटा या रुग्णालया मध्ये राखीव ठेवलया जातात.

प्रत्येक धर्मदाय रुग्णालये निर्धन रुग्णांचा निधी (आयपीएफ) असा स्वतंत्र निधी निर्माण करतात (निर्धन व दुर्बल घटकातील रुग्ण सोडून)इतर सर्व रुग्णांच्या स्थुल देयकांच्या रक्कमेतुन

दोन टक्के रक्कम कोणतेही वजावट न करता जमा करतात.तसेच निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना उपचार देण्याकरिता धर्मदाय रुग्णालयांना प्राप्त देणग्या हया निर्धन रुग्णांच्या निधी खात्यात जमा करतात.या निधीतुन निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना मोफत सेवा पुरविल्या जातात.

( निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांनी वरील धर्मदाय रुग्णालयात मोफत औषधोपचार करुण घ्यावा.